मोटार अपघात दावा क्र.२६२/२०२४
पार्वती व ईतर वि.व्यकंट व ईतर
नि.क्र.१५

**अर्जदाराकरिता पुढील सरतपास विधीज्ञ श्री.सुरवसे यांच्या वतीने शपथेवर सुरू-**

१. साक्षीदाराने प्रथम खबर अहवाल, घटनास्थळ पंचनामा, मरणोत्तर पंचनामा व शवविच्छेदन अहवाल ही कागदपत्रे दाखल केली. सबब, त्यांना **नि.क्र.१६ ते नि.क्र.१९** देण्यात येते.

**गैरअर्जदार क्र.२ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.जी.डोईजोडे यांच्या वतीने**

२. सदरचा अपघात मी पाहिला नाही. अपघाताच्या वेळेस माझे पती सुध्दा घटनास्थळी हजर नव्हते. ऐकिव माहितीवरुन पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल करण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघात हा आक्षेपार्ह वाहन चालकाच्या निष्काळजीपणामुळे घडल्याचे मी खोटे सांगितले आहे. मयत हा तीन वर्षाचा होता आणि जखमी मुलगा सात वर्षाचा आहे. घटनेच्या वेळी दोन्ही मुले दुकानाकडे खाऊ आणण्यासाठी गेले होते. हे म्हणणे खरे नाही की, रहदारीच्या नियमाचे पालन न केल्यामुळे सदरचा अपघात घडला आणि सदर अपघातात कार चालकाची काही एक चुक नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पतीने पोलीसांशी संगनमत करून कार चालकाविरूध्द खोटे प्रकरण दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात हा आक्षेपार्ह कारच्या सहभागामुळे झाला नाही. माझ्या पतीच्या उत्पन्नाबद्दल कुठलाच पुरावा दाखल केला नाही. माझी मुले जिल्हा परिषद शाळेत शिकत होती. हे म्हणणे खरे नाही की, माझे पती मयतास चांगले शिक्षण देणार होते असे मी खोटे नमूद केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आणि खोटी साक्ष देत आहे.

**गैरअर्जदार क्र.१ करिता उलट तपास विधीज्ञ श्री.एस.के.जोशी यांच्या वतीने**

पुकारा केला असता गैरहजर, उलट तपास नाही.

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.** श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

स्वाक्षरित/-
(साजिद आरिफ सैय्यद)
जिल्हा न्यायाधीश-४ व
सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
लातूर.

दि. ०४.०७.२०२६